महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. :तंशिविकापु/विवि-५/छ.शि.म.ज./२०२३/ ८५४ दिनांक : 17 FEB 2023

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था.
उपसचिव,
म.रा.तं.शि.मं. विभागीय कार्यालय, पुणे

**विषय : - छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती दिनांक १९ फेब्रुवारी, २०२३ निमीत्त विविध उपक्रम राबविणेबाबत**

संदर्भ : - १) म.शा.सा.प्र.वि.मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक : जपुती २२२३ – प्र.क्र.४२/कार्या.२९, दिनांक : १५ फेब्रुवारी, २०२३.
२) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक : जपुती-२०२२/प्र.क्र.१२०/कार्या.२९, दि.१८.०१.२०२३.
३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण १४२३/प्र.क्र.१२/१२/कार्या-३१ (राजशिष्टाचार), दि.०१.०२.२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय शासन परिपत्रक क्र. १ च्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शासनामार्फत दरवर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात येते.

दिनांक १८.०२.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व संस्थाप्रमुखांनी आपल्या कार्यालयात/ संस्थेच्या परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा असल्यास त्या परिसराची स्वतः पाहणी करुन संबंधित यंत्रणांकडून रंगरंगोटी, साफसफाई व सुशोभीकरण करुन घेऊन ते झाल्याची खातरजमा करुन घ्यावी.

**छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीचे औचित्य साधून दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता महाराष्ट्र राज्याच्या राज्यगीताचे गायन करुन सर्व संबंधित संस्थाप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुतळा/प्रतिमेस पुष्पहार अर्पण करावे. तद्नंतर छोटेखानी सांस्कृतीक समारंभाचे आयोजन करण्यात यावे.**

उपरोक्त उल्लेखित उपक्रम यशस्वीरित्या पार पाडावयाचे असल्याने त्याचे योग्य व काळजीपूर्वक नियोजन करणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने सर्व संस्थाप्रमुखांनी दिनांक १९ फेब्रुवारी, २०२३ रोजी होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंतीच्या कार्यक्रमाचे सर्व बाबीची काटेकोरपणे नियोजन करुन अंमलबजावणी करावी.

कृ.मा.प.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व संस्थाप्रमुखांनी संदर्भीय शासन परिपत्रकाचे अवलोकन करुन, सदर परिपत्रकामध्ये नमूद मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या विभागीय कार्यालयास info.dteropune@gmail.com या इमेल वर सादर करण्यात यावा.

सोबत : संदर्भिय शासन परिपत्रक.

**(मा.रा.जाधव)**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंती
दिनांक १९ फेब्रुवारी,२०२३ निमित्त
<u>विविध उपक्रमासंदर्भात</u>

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**परिपत्रक क्रमांक: जपुती- २०२३/प्र.क्र.४२/कार्या.२९,**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ फेब्रुवारी, २०२३

<u>संदर्भ</u>:-१) सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक : जपुती-२०२२/ प्र.क्र.१२०/कार्या.२९,दि.१८.०१.२०२३.

२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण १४२३/प्र.क्र.१२/कार्या-३१ (राजशिष्टाचार),दि.०१.०२.२०२३.

<u>परिपत्रक</u> :-

संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील दिनांक १८.०१.२०२३ च्या परिपत्रकान्वये राज्यातील राष्ट्र पुरुष/ थोरव्यक्ती यांची जयंती साजरी करण्याबाबतचे निदेश दिलेले आहेत.

२. शासनामार्फत दरवर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची शासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात येते. दिनांक १९ फेब्रुवारी चे औचित्य साधून या थोरपुरुषाचे ज्या ज्या ठिकाणी पुतळे/स्मारके आहेत, तेथे देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येते.

दिनांक १८.०२.२०२३ रोजी सकाळी ११.०० सर्व अधिकारी व संबंधित विभाग प्रमुख यांनी स्वत: पुतळा परिसराची पाहणी करुन संबंधित यंत्रणांकडून रंगरंगोटी,साफसफाई व सुशोभिकरण करुन घेऊन ते झाल्याची खातरजमा करुन घ्यावी.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१ फेब्रुवारी,२०२३ शासन निर्णयान्वये महाराष्ट्राच्या राज्यगीताची घोषणा करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ नुसार छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीचे औचित्य साधून दिनांक १९ फेब्रुवारी पासून सदर गीत दिनांक १९ फेब्रुवारी,२०२३ पासून महाराष्ट्राचे राज्य गीत म्हणून अंगीकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

४. तसेच दिनांक १९.०२.२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता महाराष्ट्र राज्याच्या राज्यगीताचे गायन करुन सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करावे. तद्नंतर छोटेखानी सांस्कृतीक समारंभाचे आयोजन करण्यात यावे.

५. उपरोक्त उल्लेखित उपक्रम यशस्वीरित्या पार पाडावयाचे असल्याने त्याचे योग्य व काळजीपूर्वक नियोजन करणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी दिनांक १९ फेब्रुवारी,२०२३ रोजी होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंतीच्या कार्यक्रमाचे सर्व बाबीची काटेकोरपणे नियोजन करुन अंमलबजावणी करावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा सांकेतांक २०२३०२१५१८५३३११४०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUNIL J TUMRAM

Digitally signed by SUNIL J TUMRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f9354760ec2134b55fc5015cb5f40c1a84b2911f75fbfba8119d9bf938 6d99ff, pseudonym=9C345C372F8D75728D4551FC0FC80F34527517E0, serialNumber=FABC7354592064AD03CC8773FDCEE5B2A306C86F9E7AE675 47FF7A59ADD114E3, cn=SUNIL J TUMRAM
Date: 2023.02.15 18:59:39 +05'30'

( सु.ज.तुमराम )
कार्यासन अधिकारी

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई.
४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अ.मु.स.(प्र.सु.,र.व का.),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
७. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मंत्रालयीन विभाग.
९. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने
१०.सह सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग (प्रशा-४), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.
११.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( प्रसिध्दी देण्यासाठी )
१२.सर्व विभागीय आयुक्त.
१३.सर्व जिल्हाधिकारी.
१४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१५.आयुक्त, सर्व महानगरपालिका
१६.निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली
१७.निवड नस्ती ( कार्यासन-२९).